| | | |
|---|---|---|
| महाराष्ट्र पोलीस | **पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर**<br>तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)<br>दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६<br>Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव |

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ३८ /२०२३ दि. १४/०३/२०२३

## "वाहतूक नियंत्रण अधिसुचना"

**ज्याअर्थी,** ठाणे महानगरपालिका, ठाणे कार्यक्षेत्रात कासारवडवली वाहतूक उप विभागाचे हद्दीत मे. जे. कुमार इन्फ्राप्रोजेक्ट लि. कंपनी कडून मुंबई मेट्रो लाईन–४ चे कासारवडवली ते गायमुख पर्यत काम चालू आहे. मेट्रो–४ चे पिलरवर गर्डर टाकण्याचे काम करण्यात येणार आहे.

**ज्याअर्थी, कासारवडवली सिग्नल ते सीएनजी पंप पावेतो घोडबंदर रोड, ठाणे या ठिकाणी गर्डर टाकते वेळी ठाणे कडून घोडबंदर रोडचे दिशेने जाणारी वाहिनी जड अवजड वाहनांकरीता वाहतुकीस बंद करण्यात येणार** असल्याने, सदर परिसरात वाहतुकीची कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी, **एस. एस. बुरसे, पोलीस उप आयुक्त, मुख्यालय २, अतिरिक्त कार्यभार पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढील प्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) मुंबई–नाशिक महामार्गाने घोडबंदर रोडच्या दिशेने जाणा–या सर्व जड, अवजड वाहनांना **कापूरबावडी जंक्शन** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** अ) मुंबई, ठाणे कडून घोडबंदर रोडच्या दिशेने जाणारी सर्व जड, अवजड वाहने कापूरबावडी वाहतूक शाखा जवळून उजवे वळण घेवून खारेगाव टोलनाका, मानकोली, अंजुर फाटा मार्गे इच्छित स्थळी जातील.

ब) मुंबई, ठाणे कडून घोडबंदर रोडच्या दिशेने जाणारी सर्व जड, अवजड वाहने कापूरबावडी जंक्शन जवळून उजवे वळण घेवून कशेळी, अंजुर फाटा मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) मुंब्रा, कळवा कडून घोडबंदर रोडच्या दिशेने जाणाऱ्या सर्व जड, अवजड वाहनांना **खारेगाव टोलनाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** मुंब्रा, कळवा कडून घोडबंदर रोडच्या दिशेने जाणारी सर्व जड, अवजड वाहने गॅमन मार्गे खारेगाव खाडी ब्रिज खालून खारेगाव टोलनाका, मानकोली, अंजुर फाटा मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ३) नाशिक कडून घोडबंदर रोडच्या दिशेने जाणाऱ्या सर्व जड, अवजड वाहनांना **मानकोली नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** नाशिक कडून घोडबंदर रोडच्या दिशेने जाणारी सर्व जड, अवजड वाहने मानकोली ब्रिज खालून उजवे वळण घेवून अंजुर फाटा मार्गे इच्छित स्थळी जातील.

जड अवजड वाहने सोडून इतर वाहने ही **पिलर क्र. ६० ते ६१ वर गर्डर टाकण्याचे वेळी विहंग सोसायटी कट जवळून डावे बाजूस वळण घेवून सेवा रस्त्याने पुढे नागलाबंदर सिग्नल कट जवळ उजवे बाजूस वळण घेवून मुख्य रस्त्यास आणि पिलर क्र. ९८ ते १०० वर गर्डर टाकण्याचे वेळी नागलाबंदर सिग्नल कट जवळ डावे बाजूस वळण घेवून सेवा रस्त्याने पुढे इंडीयन ऑयल सीएनजी पंप कट जवळ डावे बाजूस वळण घेवून इच्छित स्थळी जातील.**

१) दि. १३/०३/२०२३ रोजी रात्रौ २३.५५ वा. ते दि. १४/०३/२०२३ रोजी सकाळी ०४.०० वाजेपर्यत
२) दि. १४/०३/२०२३ रोजी रात्रौ २३.५५ वा. ते दि. १५/०३/२०२३ रोजी सकाळी ०४.०० वाजेपर्यंत
३) दि. १५/०३/२०२३ रोजी रात्रौ २३.५५ वा. ते दि. १६/०३/२०२३ रोजी सकाळी ०४.०० वाजेपर्यंत

CamScanner

४) दि. १६/०३/२०२३ रोजी रात्रौ २३.५५ वा. ते दि. १७/०३/२०२३ रोजी सकाळी ०४.०० वाजेपर्यंत
५) दि. १७/०३/२०२३ रोजी रात्रौ २३.५५ वा. ते दि. १८/०३/२०२३ रोजी सकाळी ०४.०० वाजेपर्यंत
६) दि. १८/०३/२०२३ रोजी रात्रौ २३.५५ वा. ते दि. १९/०३/२०२३ रोजी सकाळी ०४.०० वाजेपर्यंत
७) दि. १९/०३/२०२३ रोजी रात्रौ २३.५५ वा. ते दि. २०/०३/२०२३ रोजी सकाळी ०४.०० वाजेपर्यंत
८) दि. २०/०३/२०२३ रोजी रात्रौ २३.५५ वा. ते दि. २१/०३/२०२३ रोजी सकाळी ०४.०० वाजेपर्यंत
९) दि. २१/०३/२०२३ रोजी रात्रौ २३.५५ वा. ते दि. २२/०३/२०२३ रोजी सकाळी ०४.०० वाजेपर्यंत
१०) दि. २२/०३/२०२३ रोजी रात्रौ २३.५५ वा. ते दि. २३/०३/२०२३ रोजी सकाळी ०४.०० वाजेपर्यंत

सदरची वाहतूक अधिसूचना वर नमूद कालावधी दरम्यान गर्डर टाकण्याचे काम पूर्ण होईपर्यंत अंमलात राहील.

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( एस. एस. बुरसे )
पोलीस उप आयुक्त, मुख्यालय २, ठाणे शहर,
अतिरिक्त कार्यभार
पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/— सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर,**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर.
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर.
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर.
मा. जिल्हाधिकारी, ठाणे.
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ—५ वागळे इस्टेट व विशेष शाखा, ठाणे.

**प्रत कार्यवाहीसाठी :—**
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे

**प्रत** :— पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर.
२/— सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत** :— समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/— सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत** :— सपोआ वाहतूक विभाग, ठाणे, वागळे व प्रभारी अधिकारी, कापूरबावडी, कळवा, नारपोली, वागळे, वाहतूक उपविभाग.
२/— म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सुचना फलक लावून घ्यावीत.

CamScanner